निवडणूक तातडीचे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २ जानेवारी, २००२.

## आ दे श

क्रमांक-एसईसी/एमसी/२००२/प्र.क्र.१/का-१०. ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या ७३ व्या व ७४ व्या दुरुस्तीनुसार राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे ; आणि

ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम १९(१)(बी), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम १२, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७अ व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ११ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका व नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयुक्त जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी प्रभागनिहाय विभागून व छापून अधिप्रमाणित करुन वापरावयाची आहे; आणि

ज्याअर्थी, वरील तरतुदीप्रमाणे मतदार यादी तयार करीत असताना विधानसभेच्या मतदार यादीनुसार मतदारांची नांवे ज्या निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे, त्याऐवजी त्या मतदारांची नांवे दुस-याच निवडणूक प्रभागांमध्ये चुकीने समाविष्ट होऊन छापली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच महानगरपालिका अथवा नगर परिषद क्षेत्रासाठी राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीत नांवे असूनदेखील प्रभागनिहाय मतदार यादी तयार करुन छापताना कोणत्याही निवडणूक प्रभागामध्ये नांव समाविष्ट करुन छापण्याचे राहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व २४३ झेड्ए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक-३) चे कलम १८अ, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम क्रमांक-२) चे कलम ९बी, मुंबई प्रांतिक

..२/-

महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक-५९) चे कलम १४(४) व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा अधिनियम क्रमांक ४०) चे कलम १०अ(४) खालील व राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी काढलेल्या काही आदेशांचे अंशतः अधिक्रमण करुन आता राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. हे आदेश राज्यातील सर्व महानगरपालिका, नगर परिषदा तसेच नगर पंचायती यांच्या निवडणुकांसाठी लागू असतील.

२. विधानसभा मतदार यादीवरुन महानगरपालिका, नगर परिषदा अथवा नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी विधानसभा मतदार यादी प्रभागनिहाय विभागून छापून व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द केल्यानंतर काही मतदारांची नांवे ज्या प्रभागात असणे आवश्यक आहे, त्याऐवजी दुस-याच प्रभागाच्या मतदार यादीत चुकीने छापण्यात आल्यास अथवा राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस ज़्या मतदाराचे नांव संबंधित क्षेत्राच्या विधानसभा मतदार यादीत असूनदेखील ते नांव महानगरपालिका, नगर परिषदा अथवा नगर पंचायतींच्या निवडणुकीच्या प्रभागनिहाय मतदार यादीत छापावयाचे राहून गेल्यास मतदार यादी तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकृत अधिका-याने त्यासंदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात.

३. सदर दुरुस्त्या महानगरपालिका, नगर परिषदा अथवा नगर पंचायतींच्या निवडणुकांची नामनिर्देशनपत्रे भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करता येतील. मात्र, याचा अर्थ असा नव्हे की, मतदार यादीत नवीन नांवे समाविष्ट करण्याची अथवा वगळण्याची परवानगी देण्यात आली आहे.

( य. ल. राजवाडे )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
एएबी३२४

91